संशोधन आराखडा

खेळाडुंच्या क्रीडा संपादनुकेवर पालकांचा आर्थिक, सामाजिक व निवास परिसराचा होणारा परिणाम - एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड शारीरिक शिक्षण विद्याशाखेअंतर्गत शारीरिक शिक्षण विषयातील पीएच.डी पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

: संशोधक :

प्रा.वाकनकर गोविंद बन्सीधरराव

(बी.एस्सी., एम.पी.एड.)

कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

जि.परभणी

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ. शेजुळ माधव देसाई

शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख,

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

ता.जि.परभणी

एप्रिल २०१६

खेळाडुंच्या क्रीडा संपादनुकेवर पालकांचा आर्थिक, सामाजिक व निवास परिसराचा होणारा परिणाम - एक अभ्यास

प्रस्तावना :

व्यक्तीच्या शारीरिक, बौध्दिक, भावनिक व सामाजिक विकासासाठी आनंददायी गतिमान व क्षमता वर्धक अशा शारीरिक हालचाली व नियोजन पुर्ण दिले जाणारे शिक्षण म्हणजे शारिरीक शिक्षण होय. शारीरिक शिक्षणामध्ये हालचाली ,योग अभ्यास शारीरिक कवायत आणि क्रिडा यांचा समावेश होतो. क्रीडेमुळे केवळ शारीरिकच नव्हे तर मन भावना,विचार इत्यादीचे संस्कार केले जातात. म्हणुनच फार प्राचिन काळापासुनच क्रीडा क्षेत्राला मानवी जिवनात महत्वाचे स्थान देण्यात आलेले आहे.

भटकणारा माणूस एकाजागी स्थिर झाला शेतीकरुन राज्य निर्माण करुन एका ठिकाणी राहू लागला तेव्हापासुन धर्मशिक्षण,व्यवसाय शिक्षण, आहार शिक्षण समाज एकमेकांकडुन घेऊ लागला. सर्व शिक्षण प्रक्रियेमध्ये आजआपण ज्या संदर्भात शारीरिक शिक्षण म्हणतो. रामायण, महाभारत या काळापासुनच संरक्षणासाठी म्हणुन शारीरिक शिक्षण वापर केला जात होता. हे शिक्षण क्षत्रियांना म्हणजे ठराविक वर्गांना दिले जायचे एवढे निश्चित सांगता येते की, आजच्या अनेक शारीरिक कृती, हालचाली व कुस्ती, यांच्या शर्यती, यासारख्या क्रीडा प्रकारांचा मूळ संदर्भ आपणास रामायन व महाभारतापासुनच मिळतो. सांघिक व वैयक्तिक खेळाची निर्मीती युमुनेच्या तीरावर चालणा-या श्रीकृष्ण व त्यांच्या मित्र व मैत्रीणींमध्ये चालणा-या क्रीडांपासून झालेली सापडते आखाडे, तालीमखाने, व्यायामशाळा यांच्यामधुन गुरु सरदार राजे महाराजे यांना शारीरिक शिक्षण दिले जायचे यामध्ये वेगवेगळ्या क्रीडांचा समावेश होत असे. त्याच काळात महाविर व गौतम बुद्धांनी चातुवर्णाविरुद्ध आवाज उठविला व त्याकाळात कुस्ती, धावणे, भालाफेक, घोड्यावरुन रपेट इ. व्यायाम प्रकार अस्तीत्वात आले. सर्व पुर्वार्धात घडले मात्र उत्तरार्धात स्वच्छंद खेळाच्या फार प्रचार झाला याचे फलीत म्हणजे इ.स. पुर्व ७७६ मध्ये

ग्रीस देशात देवाच्या सन्मानासाठी खेळ सुरु झाले. दर चार वर्षांनी हे खेळ व्हायचे. खेळ आयोजित करण्याच्या वर्षी सर्व राज्यात लढाया बंद करण्यास सांगण्यात येत असे. सुमारे १२०० वर्षे हे खेळ चालु होते पुढे ग्रीस देशावर रोमण सम्राटाचे वर्चस्व सुरु झाले आणि त्यामुळे ऑलंपीक खेळाचा अस्त सुरु झाला. अखेर पियोडीअस या रोमन सम्राटाचे हे खेळ बंद केले. मात्र १८ व्या शतकामध्ये रुसोसारख्या मानसशास्त्रज्ञाने पुन्हा एकदा या खेळाचे महत्व लोकांना स्पष्ट करुन दिल्याने १८ व्या शतकाच्या शेवटी पुन्हा एकदा या स्पर्धा उदयास आल्या त्यानंतर उत्तरोत्तर सांघिक खेळाचे महत्व वाढतच गेल्याचे आपणास दिसते. या वाढत्या महत्वाचा विचार करुन शारीरिक शिक्षणात विविध विदयाशाखांची निमीर्ती करण्यात आली. मानवाच्या शारीरिक, बौध्दिक व मानसिक विकासाच्या उद्देशाने शिक्षणात विविधता निर्माण झालेली आहे. शिक्षणात विविध विषयांची योजना त्याच निमीत्ताने केलेली आढळते. मानवाच्या शारीरिक सदृढतेशिवाय त्याच्या बुध्दिचा व भावनांचा योग्यविकास होऊ शकत नाही. त्यामुळे शालेय स्तरापासुनच शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या शरीराची योग्य जडणघडण घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. खेळाडुच्या शारीरिक, बौद्धीक, भावनिक व सामाजिक विकासासाठी शारिरीक हालचाली द्वारे नियोजन पुर्व दिले जाणारे शिक्षण म्हणजेच शारीरिक शिक्षण होय. शारीरिक शिक्षाणामध्ये हालचालींचा अभ्यास, शारीरिक कवायत आणि क्रीडा, यांचा समावेश होतो. क्रीडेमधुन केवळ शारीरिकच नव्हे तर मन भावना, विचार इत्यादींवर संस्कार केले जातात.

समाज व राष्ट्राला प्रगतिपथावरर नेण्यासाठी क्रीडा हे साधन महत्वाचे आहे. म्हणुनच समाजाला क्रीडेचे व पर्यायाने शारीरिक शिक्षणाचे महत्व पटवून देवून आज क्रीडा ही काळाची गरज आहे याची जाणीव समाजामध्ये निर्माण झाली आहे. तज्ञ व्यक्ती शारीरिक शिक्षणाविषयक जाणीव बाळगून आपल्या आयुष्यातील बराचसा वेळ शारीरिक सदृढतेसाठी व क्रीडेसाठी देतात पण बहुतांश लोक आपल्या आयुष्यात सर्व जबाबदा-या पुर्ण करताना शारीरिक साधनेला किंवा क्रीडासाधनेला वेळ देत नाहीत.

आपल्या देशाच्या इतिहासाकडे एक दृष्टीक्षेप टाकताच असे समजते की वैदीक काळात राष्ट्रसंरक्षण व उपासना इत्यादीसाठी क्रीडा केल्या जात असत. मराठ्यांच्या उज्वल इतिहासात म्हणजेच शिवकालात दांडपट्टा, मुष्टीयुद्ध, भालाफेक या क्रीडा सर्वत्र होत असल्याचे समजते.

आजच्या शिक्षणक्रमाकडे पाहील्यावर असे लक्षात येते की, प्राथमिक स्तरावरुन ते उच्च शिक्षणापर्यंत सर्वत्र शारीरिक शिक्षण या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. पण विषयाचा केवळ अभ्यास क्रमात समावेश करुन चालणार नाही तर त्यासाठी आवश्यक असणारे स्पर्धासाठीचे योग्य वातावरण खेळाडुंना संधी मिळणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सर्व क्रीडाप्रकारांसाठी आवश्यक त्या सोई सुविधा मुबलक प्रमाणात योग्य स्थितीत व चांगल्या दर्जाच्या मिळणे अतिशय आवश्यक आहे.

वरील भौतिक गोष्टीशिवाय इतरही घटक आहेत की ज्यांचे तीव्र व निरंतर परिणाम क्रीडा सहभाग व संपादनुकीवर होतात. क्रीडा संपदनुक ही आर्थिक व सामाजिक स्तरावर अवलंबुन असतो. त्यांचा देखील विचार करणे गरजेचे आहे. आपण ज्या समाजात वापरतो त्या समाजातील क्रिडेचे नेमके स्थान काय आहे. जर समाजात क्रीडेला निम्नस्तरावर गणल्या जात असेल तर त्याचे क्रीडा सहभाग संपादनुकीवर प्रतिकुल परीणाम होतात. तसेच पालकांची आर्थिक परिस्थिती या घटकाचा देखील प्रत्यक्ष परिणाम क्रिडा संपादनुकीवर होतो. आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यावर रोजगारीसाठी शरीरक्षम व क्षमतेचा वापर होतो हे आपण पाहतच आहोत. याप्रमाणेच आणखी परिणामकारक घटक म्हणजे खेळाडुचे निवास स्थान होय. निवास परिसर हा खेळाडुंच्या शारीरिक व मानसिक आरोग्यात फार महत्वाची भुमिका बजावताना दिसते.म्हणुनच खेळाडुंच्या संपादनुकीवर खेळाडुच्या खिलाडु वृत्तीवर आशावादी दृष्टीकोण मेहणतीसाठी प्रेरणा इ.बाबींवर निवास परीसराचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या परिणाम होत असतो. म्हणुन खेळाडुच्या संपादनुक ही पालकाची आर्थिक व सामाजिक स्थिती आणि निवास परिसर यांचा नेमका कसा व किती

प्रमाणात परिणाम होतो तसेच खेळाडुंच्या संपादनुकेवर या घटकांचा होणारा प्रतिकुल परिणाम टाळण्यासाठी काय करता येईल याचा विचार या संशोधनाच्या माध्यमातुन करण्याचे योजीले आहे.

विषयाचे महत्व :

आज २१ व्या शतकात सर्वच क्षेत्रात स्पर्धा निर्माण झालेली आहे. व्यक्तीला आपले अस्तित्व टिकवून सन्मानाने जगण्यासाठी समाजात स्पर्धा करावी लागत आहे. आर्थिक राजकीय, धार्मीक, क्षेत्रात स्पर्धा मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. परंतू या स्पर्धेत असेच व्यक्ती टिकतात ज्यांच्या स्पर्धसाठी पोषक वातावरण भक्कम आर्थिक पाढबळ, सुदृढ मन, ठाम मत निर्माण करणारी विचार परंपरा व सभोवतालच्या परीसरातील सकारात्मक विचाराची मानसं लाभलेली आहेत. क्रीडा क्षेत्रातही खेळाडुंना आपल्या विजयाच्या संपादनुकेपर्यंत पराकाष्टा करावी लागते. केवळ ईच्छाशक्तीच्या बळावर विजय मिळवणे शक्य नाही कारण इच्छा पुर्ण करण्यासाठी आर्थिक पाठबळ व निवास परीसरातील वातावरण या गोष्टीही तितक्याच महत्वाच्या असतात. खेळ हे मुळातच सामाजिक कृती आहे त्यामुळे खेळाडुच्या विकासावर, त्यांच्या कौशल्याच्या विकासावर, स्पर्धा चालु असताना असलेल्या स्थिर वृत्तीवर विजय अवलंबुन असतो व त्याची स्थिरवृत्ती त्याच्या कौटुंबीक व सामाजिक स्तरावर अवलंबुन असतो. खेळाडुच्या खेळावर त्याच्या कुटंबांच्या आर्थिक स्थितीचा व सामाजिक परीसराचा परिणाम होत असतो हा परिणाम नेमका कसा होतो. हे अभ्यासने आवश्यक आहे.

या विषयाच्या अभ्यासातुन आर्थिक व सामाजिक स्तर खेळाडुंच्या खेळातील संपादनुकतेवर कसा परिणाम करतो याचा आढावा घेऊन त्यात कशा पद्धतीने सुधारणा करता येतील याचा आढावा घेणे शक्य होईल. निवास परिसरातील वातावरणातून खेळाडुला प्राप्त होणा-या सकारात्मक प्रेरणा कशा वाढवता येतील याचाही विचार या संशोधन कार्यातुन करता येईल. ज्या विद्यार्थ्यांच्या कौटुंबीक आर्थिक अडचणींमुळे क्रीडा

संपादनुकतेवर परिणाम होतो आहे. त्या करीता शासकीय धोरणाच्या माध्यमातुन काही उपाय सुचविणे या अभ्यास विषयाच्या माध्यमातुन शक्य होणार आहे.

अभ्यासाची उद्दीष्टये :

१) खेळाडुच्या क्रीडा संपादनुकतेचा अभ्यास करणे.

२) खेळाडु पालकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) पालकांच्या सामाजिक स्तराचा अभ्यास करणे.

४) खेळाडूंच्या निवास परिसराचा अभ्यास करणे.

५) खेळाडुच्या क्रीडा संपादनुकीवर पालकांच्या आर्थिक व सामाजिक स्तर व निवास परिसरातील वातावरणाचा होणारा परिणामाचा अभ्यास करणे.

अभ्यासाची गृहीतके :

१) खेळाडुच्या क्रीडा स्पर्धा संपादनुकेवर पालकांच्या आर्थिक परिस्थीतीचा सकारात्मक परिणाम होतो.

२) खेळाडुंच्या क्रीडा स्पर्धा संपादनुकेवर पालकांच्या सामाजिक स्तराचा सकारात्मक परिणाम होतो.

३) परभणी जिल्ह्यातील खेळाडूंच्या क्रीडा संपादनुकतेत क्षेत्रनिहाय (डोंगरी भाग, नदीकाठचा परिसर, शहरी-ग्रामीण परिसर, उच्च वर्गीय-मध्यम वर्गीय-निम्न वर्गीय निवास परिसर इत्यादी) विषमता आढळून येते.

४) परभणी तालुक्यातील खेळाडूंची क्रीडा संपादनुक इतर तालुक्यातील खेळाडूंच्या क्रीडा संपादनुकीपेक्षा चांगली आहे.

संशोधन क्षेत्र :

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी परभणी जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडण्यात आले आहे. परभणी जिल्ह्यातील स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड विद्यापीठाशी संलग्नीत

वरिष्ठ महाविद्यालयातील खेळाडुच्या पालकांच्या आर्थिक व सामाजिक स्तर आणि निवास परिसर यांचा होणा-या परिणामाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

कालावधी :

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या कार्यक्षेत्रातील खेळाडूंच्या सन २०११ ते २०१५ कालावधीतील क्रीडा संपादनुकेचा अभ्यास करण्यात येणार आहे. २०११ ते २०१५ असा सलग पाच वर्षाचा कालावधी अभ्यासासाठी निश्चित केला आहे.

संशोधन पद्धती :

या विषयाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने प्राथमिक साधन सामुग्रीचा वापर केला जाणार आहे. अभ्यासासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीने जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील (परभणी, सेलू, जिंतूर, मानवत, गंगाखेड, पाथरी, पुर्णा, सोनपेठ, पालम) निवडक खेळाडुंची नमुना निवड करण्यात येणार आहे. निवडलेल्या नमुन्यांची माहिती संकलीत करण्यासाठी प्रश्नावलीचा/अनुसुचीचा वापर करण्यात येणार आहे. प्रबंध लेखनासाठी विश्लेषण, वर्गीकरण, पृथकरण पद्धतीचा अवलंब केला जाईल.

माहिती संकलन पध्दती :

सदरील अभ्यासात माहिती जमा करण्यासाठी अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे. तयार केलेली अनुसूची ही प्रमाणित, शास्त्रीय पध्दतीने तयार केलेली, वस्तुनिष्ठता व सत्यता या निकषांवर पडताळून पाहिली जाणार आहे. या अनुसूचीमध्ये तीन भाग केले जाणार आहे.

भाग-अ - या भागात नमुना म्हणून निवडलेल्या खेळाडूंच्या वैयक्तिक माहितीशी संबंधीत प्रश्न समाविष्ट असणार आहेत. त्यात त्यांच्या क्रीडा संपादनुकीशी संबंधीत प्रश्नांचा समावेश असणार आहे.

भाग-ब - या भागात नमुना म्हणून निवडलेल्या खेळाडूंच्या कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर आधारीत प्रश्न असणार आहेत.

भाग-क - या भागात नमुना म्हणून निवडलेल्या खेळाडूंच्या निवास परिसरावर तेथील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी स्थितीशी संबंधीत प्रश्नाचा समावेश केला जाणार आहे.

वरील प्रकारची अनुसूची तयार करुन त्याच्या आधारे माहिती संकलित केली जाणार आहे. संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण व पृथकरण या अभ्यासातून करण्यात येईल.

प्रकरण रचना :

१) प्रस्तावना.

२) संदर्भ साहित्याचा आढावा.

३) संशोधन पध्दती

४) संकलित माहितीचे वर्गीकरण व पृथकरण.

५) सारांश, निष्कर्ष व शिफारशी.

मार्गदर्शक
प्रा.डॉ.शेजूळ माधव देसाई
शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी
ता.जि.परभणी

संशोधक
प्रा.वाकनकर गोविंद बन्सीधरराव
क्रीडा संचालक,
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ
ता.सोनपेठ जि.परभणी

संदर्भ साहित्य :

१) शारीरिक शिक्षणाचा भाग-१ - प्रा.श्री पाल.आर. कांदे

२) क्रीडा ज्ञानकोष - डायमंड प्रकाशन.

३) खेळ, खेळाडु व क्रिडा शिक्षक - राम भागवत

४) शारीरिक शिक्षा में संगठन प्रशासन व पर्यवेक्षण - डॉ. एम के सिंह

५) शारीरिक शिक्षा में संगठन एवं प्रशासन - देवेंद्र सिंह हल.

६) आंतरराष्ट्रीय विविध खेळ नियम शालोकत माहिती - प्रा.विनोद धरम

७) शारीरिक शिक्षा में अुनसंधान की प्रक्रीया - डॉ. राकेश गुप्ता

८) सामाजिक संशोधन पद्धती - डॉ. प्रदिप आगलावे.

९) प्रा. वाकवांड १९९७ चे मासिक जुलै, ऑक्टो (पा.क्र. १६,१७) - पावती प्रकाशन, पुणे.

१०) प्रगत क्रीडामानसशास्त्र - डॉ. प.म.आलेगावकर

११) शारीरिक शिक्षण - प्रा. स्वाती गाडगीळ

१२) शारीरिक शिक्षणाचा इतिहास - प्रा. गो.ना. पुरंदरे